# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि – ४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**विशेष मागासवर्ग कक्ष**

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५ फोन नं. ०७१३२ - २१६५९६

जावक क्रमांक : गों.वि./वि.मा.क./ ३७८६ /२०२१ — दिनांक : १३/१२/२०२१

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :-** .शिक्षकीय पदांची बिंदुनामावली प्रथम तपासणी करण्याकरीता कॅम्प आयोजीत करण्याबाबत

**संदर्भ :-** **१.** सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.उशिनाग/पदभरती/रोस्टर कॅम्प/७७७३/२०२१ दिनांक ०१/१२/२०२१ नुसार

**२.** महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. आढावा -१५१३/म.शि.५ दि. ०३.११.२०१८

**३.** महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. आढावा -१५१३/प्र.क्र.१२५ (भाग-८)/म.शि.मंत्रालय, मुंबई दि. १२ नोव्हेंबर, २०२१

**४.** संचालनालयाचे पत्र क्र. पदभ/११२१/प्र.क्र.१०/मवि-१/१३६५५, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१

**५.** मा. सचिव, उच्च शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली झालेली ऑनालाईन सभा दि. २९ नोव्हेंबर, २०२१

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. ०३.११.२०१८ अन्वये दि. ०१.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी रिक्त पदे विहित अटी व शर्ती नुसार भरण्यास मान्यता देण्यात आलेली होती व त्यानुसार पदभरतीसाठी अनुज्ञेय करण्यात आलेली पदे महाविद्यालयांना कळविण्यात आलेली होती. शासन निर्णय दि. ०४.०५.२०२० अन्वये पदभरतीस निर्बंध आल्याने पदभरतीस अनुज्ञेय करण्यात आलेल्या पदांपैकी काही महाविद्यालयांची पदे भरण्यात आलेली नव्हती.

शासन निर्णय दि. १२.११.२०२१ अन्वये शासन निर्णय ०३.११.२०१८ नुसार पदभरतीसाठी अनुज्ञेय केलेल्या पदापैकी न भरलेल्या पदांना पदभरतीसाठी विहित अटी व शर्ती नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. शासनाचे असेही निर्देश आहेत की, या पदभरतीसाठी नाहरकत प्रमाणपत्र ऑनलाईन प्रणालीव्दारे प्राप्त होणार असल्याने सदर कार्यवाही करण्याकरीता सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या आरक्षण धोरणानुसार बिंदुनामावली (रोस्टर) अद्ययावत करणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्याचे हित लक्षात घेता पदभरतीस पदे अनुज्ञेय केलेल्या महाविद्यालयांच्या बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी करण्याकरीता संबंधित महाविद्यालयाचे कॅम्प यथास्थिती आयोजित करण्याबाबत सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांचे संदर्भ १ अन्वये पत्रान्वये कळविले आहे.

करीता शिक्षकीय पदांची बिंदुनामावली प्रथम तपासणी करीता **दि. १५.१२.२०२१ ते २०.१२.२०२१** पर्यत संलग्नित महाविद्यालयाचे कॅम्प यथास्थिती आयोजीत केलेले असून बिंदुनामावली प्राथमिक तपासणी करण्याकरीता आपल्या महाविद्यालयाचे मुळे रोस्टर घेवून विद्यापीठातील विशेष मागास वर्ग कक्षात येवून तपासणी करून घ्यावी.

धन्यवाद !

*** शासन निर्णय दि. ०३/११/२०१८ अन्वये दि. ०३/१०/२०१७ च्या पदमान्यतेनुसार रिक्त असलेल्या पदाची बिंदुनामावली प्रमाणीत करुन देण्यात येईल.**

सहपत्र - १. शिक्षकीय पदांची बिंदुनामावली प्रथम तपासणी करिता नमूद दिनांकास उपस्थित राहण्याबाबत तालुकानिहाय यादी.

२. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र दि.०१/१२/२०२१ नुसार

13/12/2021

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**खालील यादीत नमूद दिनांकास तालुका निहाय महाविद्यालयांतील मुळ बिंदू नामावलीसह विद्यापीठात उपस्थित राहावे.**

| अ.क्र. | अशासकीय अनुदानीत महाविद्यालयांचा तालुका | वेळ | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | चंद्रपूर, मुल | सकाळी १०:३० ते दुपारी १:३० | १५/१२/२०२१ |
| | सावली, सिंदेवाही | दुपारी २:३० ते दुपारी ५:३० | |
| २ | भद्रावती, वरोरा | सकाळी १०:३० ते दुपारी १:३० | १६/१२/२०२१ |
| | चिमूर, ब्रम्हपूरी, नागभीड | दुपारी २:३० ते दुपारी ५:३० | |
| ३ | बल्लारपूर, राजूरा, कोरपना | सकाळी १०:३० ते दुपारी १:३० | १७/१२/२०२१ |
| | गोंडपिपरी, पोंभुर्णा, जिवती | दुपारी २:३० ते दुपारी ५:३० | |
| ४ | गडचिरोली, आरमोरी, कुरखेडा | सकाळी १०:३० ते दुपारी १:३० | १८/१२/२०२१ |
| | धानोरा, कोरची, वडसा (देसाईगंज) | दुपारी २:३० ते दुपारी ५:३० | |
| ५ | अहेरी, मुलचेरा, सिरोंचा | सकाळी १०:३० ते दुपारी १:३० | २०/१२/२०२१ |
| | भामरागड, एटापल्ली, चामोर्शी | दुपारी २:३० ते दुपारी ५:३० | |

13/12/2021

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१
Website:www.dirhe.in/jdnagpur/
Email: jdhengp@rediffmail.com Email: jdhengp@gmail.com
Phone No.0712- 2561713 Fax No.0712- 2554210

क्रमांकः उशिनाग/पदभरती/रोस्टर कॅम्प/7773/२०२१ दिनांकः- 01/12/२०२१

प्रति,

१) कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

२) कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

**विषय – शिक्षकीय पदांची बिंदुनामावली प्रथम तपासणी करण्याकरीता कॅम्प आयोजित करण्याबाबत.**

**संदर्भ** – १) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.आढावा-१५१३/म.शि.५, दि. ०३.११.२०१८
२) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.आढावा-१५१३/प्र.क्र.१२५(भाग-८)/ म.शि.५, मंत्रालय, मुंबई दि. १२ नोव्हेंबर, २०२१
३) संचालनालयाचे पत्र क्र.पदभ/११२१/प्र.क्र.१०/मवि-१/१३६५५, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१
४) मा.सचिव, उच्च शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली झालेली ऑनलाईन सभा दि. २९ नोव्हेंबर, २०२१ सकाळ १०.३० वाजता.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णय दि. ०३.११.२०१८ अन्वये दि. ०१.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी रिक्त पदे विहित अटी व शर्ती नुसार भरण्यास मान्यता देण्यात आलेली होती व त्यानुसार पदभरतीसाठी अनुज्ञेय करण्यात आलेली पदे महाविद्यालयांना कळविण्यात आलेली होती.

शासन निर्णय दि. ०४.०५.२०२० अन्वये पदभरतीस निर्बंध आल्याने पदभरतीस अनुज्ञेय करण्यात आलेल्या पदांपैकी काही महाविद्यालयांची पदे भरण्यात आलेली नव्हती. संदर्भिय शासन निर्णय दि. १२.११.२०२१ अन्वये शासन निर्णय दि. ०३.११.२०१८ नुसार पदभरतीसाठी अनुज्ञेय केलेल्या पदांपैकी न भरलेल्या पदांना पदभरतीसाठी विहित अटी व शर्ती नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

शासनाचे असेही निर्देश आहेत की, या पदभरतीसाठी नाहरकत प्रमाणपत्र ऑनलाईन प्रणालीद्वारे प्राप्त होणार असल्याने सदर कार्यवाही करण्याकरीता सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेल्या आरक्षण धोरणानुसार बिंदुनामावली (रोस्टर) अद्ययावत करणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता पदभरतीस पदे अनुज्ञेय केलेल्या महाविद्यालयांच्या बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी करण्याकरीता संबंधित महाविद्यालयांचे कॅम्प यथास्थिती आयोजित करुन बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी करण्याची कार्यवाही प्राध्यान्याने करण्यात यावी.

**(डॉ.संजय ठाकरे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण
नागपूर विभाग, नागपूर

प्रत :- मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, (म.रा.) मध्यवर्ती इमारत, पुणे-१